MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)
आयुएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४८१८/१७७२

दि. ३१ जुलै,२०१८

## प रि प त्र क

**विषयः- बी.एससी. (पशुसंवर्धन) पदवीधारकांना एम.एससी. (कृषी) अंतर्गत फक्त 'पशुसंवर्धन' हया विषयास पात्र समजण्याबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया कृषी परिषदेमार्फत राबविण्यात येत आहे. कृषी विद्याशाखेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये 'पशुसंवर्धन' हया विषयाचा समावेश आहे.

कृषी परिषदेच्या ८८ ठराव क्रमांक ६२/८८/२०१३ अन्वये कृषी विकास प्रतिष्ठान, बारामती या संस्थेस कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावर पशुसंवर्धन महाविद्यालय (बी.एससी. (पशुसंवर्धन)) हा अभ्यासक्रम सुरु करण्यास दि.१६/७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये परवानगी देण्यात आलेली आहे. यामध्ये बी.एससी. (पशुसंवर्धन) पदवीधारक एम.एससी. (पशुसंवर्धन) प्रवेशासाठी पात्र असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. यास अनुसरुन सन २०१८-१९ हया शैक्षणिक वर्षांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परीक्षेच्या माहिती पुस्तिकेमध्ये याबाबतचा उल्लेखही करण्यात आलेला आहे.

यास्तव बी.एससी. (पशुसंवर्धन) ही पदवी धारण करणाऱ्या ज्या उमेदवारांनी महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिताची कृषी

विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा दिलेली आहे आणि पदव्युत्तर प्रवेश माहिती पुस्तिका २०१८-१९ मध्ये नमूद केलेल्या इतर प्रवेश पात्रतेची जे उमेदवार पूर्तता करतात अशा उमेदवारांना एम.एससी. (कृषी) अंतर्गत फक्त 'पशुसंवर्धन' हया विषयाच्या प्रवेशाकरिता ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करता येतील.

(डॉ. हरिहर कौसडीकर)
संचालक (शिक्षण)

प्रति,

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करावे तसेच परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार संगणक आज्ञावलीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात.

२. मे. जे. डीन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

यांना सूचित करण्यात येते की, प्रवेशोत्सुक व पात्र उमेदवारांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

प्रत:-

कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर /डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी